मुंबई शहर व मुंबई उपनगर
जिल्ह्यातील फेरफाराबाबत.

वाचा : महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५४ व कलम १४९.

---

क्रमांक-ना.भू.१/नोंदणीकृत दस्तांबाबत/१८
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय.
नवीन प्रशासकिय इमारत, दुसरा मजला,
विधानभवन समोर, पुणे-४११ ००१
पुणे दिनांक : २६/१२/२०१८

<u>परिपत्रक</u>

विषय : महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्राप्त झालेल्या नोंदणीकृत दस्तांसाठी कलम १४९ अन्वये अर्ज करण्याची आवश्यकता नसलेबाबत. (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्याकरीता)

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५४ मध्ये दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदवीलेल्या दस्तांबाबत नोंदणी करणा-या अधिका-यांनी हस्तांतरणाबाबतची माहिती संबंधित तलाठी/तहसीलदार यांना कळविण्याबाबतची तरतुद नमुद केलेली आहे. त्या अनुषंगाने मुंबइ उपनगर जिल्हा व मुबंई शहर येथील दुय्यम निबंधकाकडे ई-मेल व्दारे नोंदणीकृत दस्तांची माहिती नगर भूमापन अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे सदर माहिती ही कलम १४९ अन्वये हक्क संपादनाचे प्रतिवृत्त समजण्यात यावे व याबाबत संबंधित खातेदार यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

व्यवसायीक सुलभता (Ease of Doing Business) च्या अनुषंगाने जनतेला शासकीय कार्यालयाकडुन तत्परतेने गतिमान सेवा मिळावी म्हणुन मिळकतींच्या फेरफाराबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने असे निदेश देण्यात येतात की, नोंदणीकृत दस्तान्वये प्राप्त झालेल्या कागदपत्राच्या बाबत फेरफार प्रक्रिया तात्काळ सुरु करण्यात यावी तसेच याबाबत सर्वसाधारण प्रकरणी (अपवादात्मक परीस्थिती वगळुन) कोणत्याही खातेदाराला कार्यालयात कागदपत्रे घेऊन बोलविण्याची आवश्यकता नाही.

एखाद्या मिळकती बाबतीत हितसंबंधित सहहिस्सेदार असतील तर त्यांचे पत्ते नगर भूमापन कार्यालयास दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन खातेदाराचा अर्ज म्हणुन त्याचवेळी प्राप्त होणार आहे. त्याबाबत योग्य त्या सुचना नोंदणी कार्यालयास देण्यात आलेल्या आहे.

सदर सुचनांची दिनांक ०१/०१/२०१९ पासुन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सही XXX
(एस. चोक्कलिंगम)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

निर्गमित
(किशोर तवरेज) २८.१२
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे

प्रारूप परिपत्रक